**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.१०

सभावृत्तांत

दिनांक ०२/१२/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/१२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ३. | मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम | सदस्य |
| ४. | मा. श्री. वाघेरे प्रभाकर नामदेव | सदस्य |
| ५. | मा. निता विलास पाडाळे | सदस्या |
| ६. | मा. आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ७. | मा. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ८. | मा. वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ९. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. धनंजय गणपत मोहिते

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. अशोक बोनगीर, लेखाधिकारी, मा. डी.एन. गायकवाड, उद्यान अधिक्षक, उद्यान , मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. सुनिल पाटील, मा. एल. बी. जाधव, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, मा. व्ही.एस. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा.अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. व्ही.पी. गजपुरे, मा. आय.के. कलाल, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. वाकोडे ए.एस.कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.संजय चव्हाण, मा. राजेंद्र जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. व्ही.ए. पाडवी, मा. भालेराव यु.ए., मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. कुंभार सी.एम. कनिष्ठ अभियंता, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण

विभाग, मा. संदीप कोतवडेकर, मा. आर.एम. सौदाई, मा. अतुल सोनवणे, मा. सरोदे व्ही. एस., मा. सतीश पाटील, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक,मा.सुनिल दुदुसकर, मा. दिलीप सटाले, उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

मा. रामदास बोकड : दिनांक १/१२/२०१६ रोजी ड प्रभाग समिती सदस्य श्री. प्रमोद ताम्हणकर यांचे वडील कै. रघुनाथराव ताम्हणकर ,वय ७३ वर्ष उत्तम मुर्ती कलाकार यांचे दु:खद निधन झाले असल्याने तसेच आपल्या देशाचे जे दोन जवान सीमेचे रक्षण करताना शहीद झाले आहेत त्यांस दोन मिनिटे उभे राहुन भावपूर्ण श्रध्दांजली वाहणेची सूचना मांडतो.

मा.आरती सुरेश चोंधे :- सदर सूचनेस मी अनुमोदन देते.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली,)

------------

**मा. सभापती**: सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात यावी.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सर्व उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे स्वागत करुन आजच्या सभेचे कामकाज सुरु करणेकामी मान्यता मिळावी. व ड क्षेत्रीय कार्यालयाचे लेखाधिकारी पदी श्री. अशोक बोनगीर व श्री. हनुमंत सरवदे यांची कार्यालय अधिक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल त्या दोन्ही अधिका-यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करणेत यावे अशी सन्मा. सभागृहास विनंती आहे.

**मा.** सभापती : ड क्षेत्रीय कार्यालयाचे नवनियुक्त लेखाधिकारी श्री. अशोक बोनगीर व कार्यालय अधिक्षक श्री. हनुमंत सरवदे यांचे सर्व उपस्थित सन्मा. सदस्य,अधिकारी व कर्मचारी यांचे वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करतो तसेच आजच्या ड प्रभाग समिती सभेचे काम सुरु करावे.

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे डिसेंबर २०१६ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** :- सभेत सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे येथे महापालिकेमार्फत जलतरण तलाव बांधण्यात आलेला आहे. सदर जलतरण तलावास “कै. दत्तोबा वाघेरे जलतरण तलाव” असे नामकरण करणे व तेथील बहुउद्देशीय हॉलला “ कै. शहाजी वाघेरे (मास्तर) क्रीडा हॉल मा. उपमहापौर प्रभाकर नामदेवराव वाघेरे यांच्या वॉर्डस्तरीय निधीतुन मंजूर” असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र. २ :** प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे येथील जगदंबा स्वीट मार्ट जवळील चौकास “संत सेवा चौक” व जोग महाराज उद्यान जवळील चौकास “श्रीहरी चौक” असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र. ३ :** प्रभाग क्र. ४५ मध्ये “जय बाबा योगिराज श्री सद्‌गुरु नाथ माऊली महाराज वाळुंजकर जय बाबा यांच्या निवासस्थानाकडे” अशा आशयाचा बोर्ड लावायचा असल्याने सदर नामफलक लावणेकामी मान्यता देणे व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत

**विषय क्र. ४ :** प्रभाग क्र. ४३ मधील वाल्मिकी आश्रमाकडे जाणा-या रस्त्यास “स्वर्गीय सुंपतराम बाल्मिकी रस्ता” असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र. ५ :**प्रभाग क्र. ४४ जुना ड प्रभाग शाळेजवळील चौकाला पंचशील चौक असे नामकरण करणेबाबतचा ड प्रभाग समिती सभा ठराव क्र. ८ दिनांक १९/६/२०१५ रोजीचा ठराव रद्द करुन सदर ठिकाणाच्या जवळ डॉ. श्री. एस.एच. कोटवानी त्यांचे कुटुंबियांसमवेत राहात होते. त्यांनी पिंपरी परिसरातील गोरगरीब लोकांचा मोफत इलाज करुन पिंपरीवासियांची निस्वार्थ सेवा केलेली आहे तसेच त्यांचे कुटुंबियसुध्दा निस्वार्थपणे समाज कार्य करीत असल्याने डेअरी फार्म रोड चौकाला “डॉ.श्री.एस.एच. कोटवानी चौक” असे नाव देणेबाबत

**विषय क्र.** ६ : प्रभाग क्र. ४३ मध्ये स्मशानभूमीतील संडास ब्लॉक असुन तेथे जवळच छोटा हॉल आहे. सदर संडास ब्लॉक पाडून छोटया हॉलच्या ठिकाणी मोठा हॉल बांधण्याबाबत

**विषय क्र.** ७ : प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक सी ब्लॉक १ येथील मनपाचे संडास ब्लॉक पाडून तेथे सुलभ पध्दतीने संडास ब्लॉक बांधणेबाबतचा प्रभाग समिती ठराव क्र. ३१ दिनांक ४/३/२०१६ रद्द करुन त्या ठिकाणी सार्वजनिक वाचनालय करणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे डिसेंबर २०१६ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे सप्टेंबर २०१६ च्या मासिक सभेच्या दिनांक ०२/०९/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ७ माहे सप्टेंबर २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे डिसेंबर २०१६ च्या कार्यपत्रिका क्र. १० वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ — ठराव क्र. २४

दिनांक ०२/१२/२०१६ — विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.नीता विलास पाडाळे — अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : मा. नीता विलास पाडाळे यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ काळेवाडी येथील पंचनाथ कॉलनी येथे पंचनाथ कॉलनीतील समोरील बाजूने व आझाद कॉलनी ३ मध्ये आता जागेवर डांबरीकरणासहीत रस्ता तयार आहे. परंतु दिनांक १८/६/२००९ ला ड प्रभाग येथे २०५ अंतर्गत ६ मीटर रस्ता तयार करण्याचा ठराव करण्यात आला. हा ठराव करत्यावेळी मनपाचे अधिकारी यांनी जागेवर जाऊन रस्त्याची पाहणी न करता हा प्रस्ताव मंजूर केला. हा रस्ता नागरीकांच्या घरावरुन टाकण्यात आला आहे. परंतु नागरीकांच्या घरांच्या दोन्ही

बाजूंनी रहदारीचा डांबरीकरणासहीत रस्ता तयार आहे. त्यामुळे पंचनाथ कॉलनी येथील २०५ अंतर्गत ६ मीटर रस्ता टाकण्यात आल आहे तो रद्द करण्यात येणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र. २५

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

दिनांक ५/८/२०१६ विभाग: आरोग्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/०७/कावि/९७७/२०१६ दि. २८/११/२०१६

केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ४३ जिजामाता हॉस्पिटल हा प्रभाग हगणदारी मुक्त करणेचे दृष्टीने मनपा शाळा व बचतगटाचे प्रमाणपत्र प्राप्त असुन आरोग्य विभागाचे कार्यवाहीनुसार सदर प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेबाबतच्या मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ०२/१२/२०१६ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. ३ ठराव क्र. २६

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे अनुमोदक : मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम

संदर्भ : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे येथे महापालिकेमार्फत जलतरण तलाव बांधण्यात आलेला आहे. सदर जलतरण तलावास “कै. दत्तोबा वाघेरे जलतरण तलाव” असे नामकरण करणेत यावे व तेथील

बहुउद्देशीय हॉलला “ कै. शहाजी वाघेरे (मास्तर) क्रीडा हॉल मा. उपमहापौर प्रभाकर नामदेवराव वाघेरे यांच्या वॉर्डस्तरीय निधीतुन मंजूर” असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ४ ठराव क्र. २७

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे अनुमोदक : मा. धनंजय गणपत मोहिते

संदर्भ : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे येथील जगदंबा स्वीट मार्ट जवळील चौकास “संत सेवा चौक” व जोग महाराज उद्यान जवळील चौकास “श्रीहरी चौक” असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ५ ठराव क्र. २८

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे अनुमोदक : मा. धनंजय गणपत मोहिते

संदर्भ : मा. प्रभाकर नामदेवराव वाघेरे यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मध्ये “जय बाबा योगिराज श्री सद्‌गुरु नाथ माऊली महाराज वाळुंजकर जय बाबा यांच्या निवासस्थानाकडे” अशा आशयाचा बोर्ड लावायचा असल्याने सदर नामफलक लावणे व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ६ ठराव क्र. २९

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. अरुण मदन टाक अनुमोदक : मा. धनंजय गणपत मोहिते

संदर्भ : मा. अरूण मदन टाक यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ मधील वाल्मिकी आश्रमाकडे जाणा-या रस्त्यास “स्वर्गीय सुंपतराम बाल्मिकी रस्ता” असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ७ ठराव क्र. ३०

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. सुनिता राजेश वाघेरे अनुमोदक : मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम

संदर्भ : मा. सुनिता राजेश वाघेरे यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ जुना ड प्रभाग शाळेजवळील चौकाला पंचशील चौक असे नामकरण करणेबाबतचा ड प्रभाग समिती सभा ठराव क्र. ८ दिनांक १९/६/२०१५ मंजुर करण्यात आला आहे परंतु आजपर्यंत त्या ठिकाणी नामफलक लावण्यात आलेला नाही. सदर ठिकाणाच्या जवळ डॉ. श्री. एस.एच. कोटवानी त्यांचे कुटुंबियांसमवेत राहात होते. त्यांनी पिंपरी परिसरातील गोरगरीब लोकांचा मोफत इलाज करुन पिंपरीवासियांची निस्वार्थ सेवा केलेली आहे तसेच त्यांचे कुटुंबियसुध्दा निस्वार्थपणे समाज कार्य करीत असल्याने सदर ठराव रद्द करुन सदर ठिकाणाच्या जवळ डेअरी फार्म रोड चौकाला "डॉ.श्री.एस.एच. कोटवानी चौक" असे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ८ ठराव क्र. ३१

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. अरुण मदन टाक अनुमोदक : मा. धनंजय गणपत मोहिते

संदर्भ : मा. अरूण मदन टाक यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ मध्ये स्मशानभूमीतील संडास ब्लॉक असुन तेथे जवळच छोटा हॉल आहे. सदर संडास ब्लॉक पाडून छोटया हॉलच्या ठिकाणी मोठा हॉल बांधण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ९ ठराव क्र. ३२

दिनांक ०२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम यांचेकडील दि. २/१२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मधील साई चौक सी ब्लॉक १ येथे मनपाचे संडास ब्लॉक पाडून तेथे नव्याने सुलभ पध्दतीचे संडास ब्लॉक बांधणेबाबतचा ठराव क्र. ३९ माहे मार्च २०१६ च्या ड प्रभाग समितीमध्ये मंजुर करण्यात आला आहे. परंतु सदर संडास ब्लॉकचे शेजारीच सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेचे काम मनपामार्फत सुरु करण्यात आले असल्याने सदर संडास ब्लॉक पाडून त्या ठिकाणी नागरीकांकरीता सार्वजनिक वाचनालय करणेत यावे या करीता दिनांक ४/३/२०१६ रोजीचा ठराव क्र. ३९ रद्द करुन सदर ठिकाणी वाचनालय करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

पाणीपुरवठा विभागाचे कामकाजाबाबत :

मा. वैशाली राहुल जवळकर : प्रभाग क्र. ५६ मधील कोणत्याही गल्ली वा कॉलनीमध्ये पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही तसेच कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा श्री. तांबे हे कोणत्याही प्रभाग समिती बैठकीस उपस्थित राहत नाहीत व प्रभागातील पाण्याच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत . प्रभाग क्र. ५६ मध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर आहे.

मा. रामदास बोकड : कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांचेकडून कोणत्याही बाबीची गांभीर्याने दखल घेतली जात नाही. प्रभाग क्र. ५६ येथील सर्व परिसरात प्रेशरने पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. या प्रभागासाठी पाण्याच्या टाकीची सोय नाही. सदर काम प्रलंबित आहे.

मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा :

प्रभाग क्र. ५६ ला सेक्टर २३ येथुन बायपास सिस्टीमद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. कमी जास्त प्रेशरमुळे उताराच्या भागात पाणी मिळते ही वास्तविकता आहे. डायनासॉर उद्यानातील टाकीचे काम पूर्ण झाल्यावर ही अडचण दुर होईल. सदर टाकीचे काम अद्याप सुरु आहे.

मा. रामदास बोकड : प्रभाग क्र. ५६ येथील पाण्याचे प्रेशर वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत.

आरोग्य विभागाचे कामकाजाबाबत :

मा. वैशाली राहुल जवळकर : कच-याच्या गाडया ४-४ दिवस येत नाहीत कोणत्याही गल्लीतील कचरा उचलला जात नाही.

मा. आरती चोंधे : कचरा उचलण्यासाठी गाडया वेळेत येत नाहीत. वारंवार पाठपुरावा करावा लागतो तसेच मोठी गाडी मिळणेबाबत कार्यवाही प्रलंबित आहे.

सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : ट्रकची संख्या वाढवली असुन तक्रारींचे प्रमाण कमी आहे.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : आरोग्य निरीक्षक श्री. सौदाई यांनी प्रभाग क्र. ५४ येथे पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. रामदास बोकड : मागील वर्षी कचरा उचलण्यासाठी जी संस्था नेमली होती त्या संस्थेऐवजी सदर संस्थेचे काम समाधानकारक नसल्याने दुसरी संस्था नेमणेबाबत कळविले असतानाही त्याच संस्थेस काम देणेबाबत कार्यवाही सुरु आहे हयाकडे लक्ष वेधतो. सदर ठेकेदाराकडून कामगारांवर अन्याय होत असुन कामगारांना वेळेवर तसेच ठरवुन दिलेला पगार मिळत नाही . सदर ठेकेदाराचे काम व्यवस्थित नाही . ते संपर्कात राहत नाही. कामगार व संस्था यांचे कामकाजावर प्रशासनाने दक्ष राहुन कार्यवाही करावी. दैनंदिन कच-याचे निर्मुलन कसे करता येईल याबाबत कार्यवाही करावी. सदर बाबीबाबत मा. वैशाली राहुल जवळकर यांनीही सहमती व्यक्त केली.

सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : एजन्सी ठरविण्याबाबतची कार्यवाही आरोग्य मुख्य कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येते. या कार्यालयाकडून अहवाल पाठविण्यात आला होता.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : स्वच्छता सेवकांच्या तक्रारींवर मध्यवर्ती विभागाकडून दिलेल्या सूचनानुसार सुनावणी घेणेत येत असुन सदर कामासाठी वकीलांची नेमणुक करण्यात आली आहे. ठेकेदारांकडून कामगारांना पगार कमी देणेत आल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात येते. सर्व कच-याचे निर्मुलनासाठी प्रायमरी व सेकंडरी पध्दतीने कचरा उचलण्याबाबत निविदा प्रसिध्दीची कार्यवाही

मुख्यालयामार्फत सुरु असुन या कामासाठी क्रिसील या संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे. यामुळे कचरा उचलण्याच्या काम व्यवस्थित रित्या होईल.

मा. राजेंद्र जगताप : जलपर्णीचा प्रश्न फार मोठा आहे. आजच्या दै. वर्तमानपत्रात जलपर्णीबाबत बातमी आली आहे.

मा. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : आरोग्य विभागाचे पाच कर्मचारी नेमले आहेत.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : सदर कामासाठी पर्यावरण विभागाकडून मशिन मागील वर्षी भाडेतत्वावर घेणेत आली होती. याबाबत निविदा कार्यवाही चालू असुन तोपावेतो आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांकडून कार्यवाही चालू आहे.

मा. रामदास बोकड : स्टॉर्म वॉटर ड्रेनचा पहिला टप्पा झाला असुन दुस-या टप्पयाचे  काम सुरु केले नाही तसेच सदर कामाबाबत चार महिन्यापूर्वी स्टॉर्म वॉटर ड्रेनचे दुस-या टप्पयाबाबतची कार्यवाही करुन तसा लेखी अहवाल प्रभाग समितीपुढे सादर करण्यात आला नाही.

अतिक्रमण विभाग :

मा. वैशाली राहुल जवळकर : सृष्टी चौकात अतिक्रमण करणा-यांवर कारवाई करावी तसेच स्वराज चौकातील अतिक्रमणाने नागरीकांना जाणे-येणेसाठी जागा नाही. अतिक्रमण विभागाने कारवाई प्रभावीपणे करावी. सद्यस्थितीत कारवाई होत नाही.

मा. रामदास बोकड : हॉकर्स झोनचे कामकाजाबाबत अद्याप कार्यवाही प्रलंबित आहे. स्थानिक हातगाडीधारकांना ज्यांनी सर्व कागदपत्रे दिली आहेत त्यांना लायसन्स द्यावे म्हणजे अनधिकृत हातगाडीधारकांना वचक बसेल. लायसन्स दिल्यावर अधिकृत हातगाडीधारकांना न्याय मिळेल व अनधिकृतपणे धंदा करणा-यांना दंड आकारण्यात यावा.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : हॉकर्स झोनच्या दराबाबतच्या विषयावर दराबाबत मा. महापालिका सभेने मान्यता दिली असुन पुढील कार्यवाही भूमि आणि  जिंदगी विभागाकडून करण्यात येईल.

उद्यान विभाग :

मा. वैशाली राहुल जवळकर : फुटपाथला जी झाडे लावली आहेत त्यांना पाणी घातले जात नाही तसेच तेथे असलेले आळे मोठे करण्यात यावे. मोठी झाडे झाली आहेत त्यांना जाळी लावण्यात येत नाही.

मा. उद्यान अधिक्षक श्री. गायकवाड : झाडांना पाणी घालण्यासाठी आळी मोठी करुन घेणेत येतील तसेच पाणी घालण्यात येईल.

मा. राजेंद्र जगताप : प्रत्येक प्रभागात दहा एफआरपी वाचनालये देणेकामी आदेश झाले आहेत. एफआरपी वाचनालयाबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे. केबीन महापालिकेकडून देणेत येतात. त्याबाबत पाठपुरावा करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा. मा. रामदास बोकड व मा. वैशाली राहुल जवळकर यांनीही प्रत्येक प्रभागात पाच एफआरपी वाचनालये देणेबाबत कार्यवाही करावी अशी सूचना मांडली.

मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : संबंधितांना मा. आयुक्त यांचे परिपत्रकानुसार सूचना दिल्या आहेत. तसेच एफआरपी केबीन बसवणेबाबत स्थापत्य विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत.

क्रीडा विभाग :

मा. राजेंद्र जगताप : पिंपळे गुरव येथील जिम्नॅशियमचे साहित्याबाबत कार्यवाही नाही. क्रीडा विभागाकडून कार्यवाही प्रलंबित आहे. क्रीडा विभागाकडे वारंवार पाठपुरावा करावा लागतो. क्रीडा विभागावर कारवाई होणे आवश्यक आहे.

मा. क्रीडा निरीक्षक श्री. गेंगजे : जिम्नॅशियमचे काही साहित्य आले आहे. मल्टीजिमचे साहित्य येणे बाकी असुन या कामाचे ठेकेदार वेगळा आहे.

मा. सभापती : पिंपरी येथील बॉक्सिंग हॉलचे काम अद्याप प्रलंबित आहे.

मा. क्रीडा निरीक्षक श्री. गेंगजे : बॉक्सिंग हॉलचे साहित्य आले आहे परंतु हॉलला पत्रे घालण्यासाठी आतापर्यंत ६ वेळा पत्रव्यवहार केला आहे. ड स्थापत्य विभागाकडून कार्यवाही करणे आवश्यक आहे. कनिष्ठ अभियंता श्री. कलाल यांनी फाईल कामाचे आदेशासाठी सादर केलेली आहे.

मा. रामदास बोकड : वैदुवस्ती येथील जिमला नवीन पडदे व मॅट बसवण्याबाबतचे काम पूर्ण नाही. पाठपुरावा करुन कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी.

मा. क्रीडा निरीक्षक श्री. गेंगजे : मॅट व पडदे घेणेबाबत आदेश देणेत आले आहेत.

मा. रामदास बोकड : आचारसंहितेच्या दृष्टीकोनातुन या महिन्याच्या शेवटचे आठवडयात विशेष प्रभाग समितीची बैठक आयोजीत करावी व सदर बैठकीचे वेळी सर्व विभागांनी काढलेली कामे, त्या कामी केलेली तरतुद व कामाची सद्यस्थिती याबाबतची माहितीसह आढावा घेणेत यावा. या कामी विशेष बैठकीचे आयोजन करावे.

मा. सभापती : ड प्रभाग समितीचा कार्यकाल दोन महिने राहिला असुन किती कामांचे आदेश देणेत आले आहेत याबाबत पाठपुरावा करावा व लवकरात लवकर कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी कार्यवाही करावी व विकास कामे पूर्ण करण्याच्या द्रष्टीने कार्यवाही करावी. सर्व उपस्थित सन्मा. नगरसदस्य व अधिकारी यांचे आभार मानुन माहे डिसेंबर २०१६ प्रभाग समितीची सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,

रहाटणी - १७

सही/-

( सीताराम बहुरे )

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२९७ /२०१६

दिनांक –०२/१२/२०१६